ISSN 2231-1629
Knowledge Resonance
A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal
IMPACT FACTOR 8.072

# नामदेव कोळी यांची कविता : काळोखाच्या कविता

**डॉ. गिरीश नारायणराव सपाटे**
*सहयोगी प्राध्यापक*
*विद्यासागर कला महाविद्यालय, रामटेक*

''काळोखाच्या कविता'' हा नामदेव कोळी यांचा पहिला कवितासंग्रह नुकताच प्रकाशित झालाय. या संग्रहात सत्तेचाळीस कविता असून डॉ. भरतसिंग पाटील यांचा ''गर्भार काळोखातील प्रकाशवेणा'' हा दीर्घ लेख जोडलेला आहे. ''वाघूर'' या नामांकित आणि वैशिष्ट्यपूर्ण दिवाळी अंकाच्या माध्यमातून संबंध महाराष्ट्रात नावलौकिक प्राप्त केलेल्या नामदेव कोळी यांच्या कवितेची नाळ मातीशी अन् गावाशी जुळलेली आहे. शेती, ग्रामजीवन आणि त्यातून निर्माण होणार शोषण या सर्वांच्या पार्श्वभूमीतून धगधगणाऱ्या व्यथा वेदनांचा पट कवीने अत्यंत भेदकपणे टिपलेला आहे.

''काळोखाच्या कविता'' या संग्रहात ''माय'' आणि ''बाप'' यांच्यावर पस्तीस कविता, बहिणीवर एक कविता, नदीवर दोन कविता, गावावर तीन कविता, बायांवर दोन कविता आणि मुंबईवर एक कविता अश्या प्रकारची विभागणी असून ग्रामजीवनातील ग्रामजीवनाचा केंद्रबिंदू असलेल्या शेतकरी अन् शेतमजूर यांच्या जगण्यातील दुःख, दारिद्र्य, त्यांच शोषण, अगतिकता, व्याकुळता या सर्वांचाच अत्यंत गंभीपणे वेध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न कवीने प्रत्युत संग्रहातून केलेला आहे.

समकालीन मराठी कवितेत ग्रामीण जीवनाच वास्तव चित्र रेखाटणारे अनेक कवी आहेत. विठ्ठल वाघ, प्रतिमा इंगोले, इंद्रजित भालेराव, केशव सखाराम देशमुख, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, प्रकाश किनगावकर, महेश केळुसकर, संतोष पवार, ऐश्वर्य पाटेकर यांची नावे यांची नावे प्रामुख्याने घ्यावी लागतात. यात आणखी एक नाव जोडावे लागते ते म्हणजे नामदेव कोळी यांचे...! ग्रामीण जीवनातील वास्तवता, तेथील प्रखर दाहकता, शेतकऱ्याला गिळू पाहणाऱ्यार भयंकर समस्या, त्यांचे कोफ्लडलेले निःश्वास, त्यांची थोपवलेली उड्डाणे, त्यांच्या व्यथा, वेदना, कळा, शोषण यांच्याशी संबंधित भाषा या संग्रहातील कवितेचे स्वरुप वास्तव असल्याचे सूचित करते. रोमँटिक वा रोमँटिक वास्तववादी कवितेपासून हा कवी अलिप्त दिसतो. त्यामुळेच त्यांच्या कवितेत दुःख, शोषण, परतंत्रता, कुरुपता, जीवनातील काळोख यावर आधारलेलं एक वास्तववादी विश्व निर्माण झालेले दिसून येते. कवी दुःखविव्हल पाखरासारखा असून त्याच्या आत्मसाधनेतून ही कविता उपजलेली आहे. आपल्या जीवनातील एकाकीपणा, रितेपणा भरुन काढण्यासाठी कवी व्याकुळ होऊन हंबरतो आहे. त्याचे हे हंबरणेच कवितेचे रुप घेते. उत्कट अनुभूतीचा विस्तार होतो व तिची पातळीही उंचावते. काळजावर सातत्याने होणारे घाव कवीचं अंतरंग उकलायला कारणीभूत ठरते. कवीची वृत्ती अंतर्मुख होऊन त्याच्यातील सर्जनशक्तीला जाग येते. स्वतःला अभिव्यक्त करण्यासाठी कवी कवितेच्या आश्रयाला जातो. कवितेच्या रुपबंधाचा विचार करतो. कवितेचा इतिहासही तपासून बघतो. ''कविता तेव्हाही होती/आजही आहे/रात्रीला घट्ट बिलगलेल्या/काळोखासारखी.'' काळोखालाही इतिहास आहे. शेकडो वर्षांपासूनचा हा काळोख व्यवस्थेला ग्रासून आहे. अन्यायाची आणि शोषणाची प्रथा पूर्वीपासूनच समाजाला उध्वस्त करते आहे. माणसाला माणूस म्हणून जगू देत नाही. शेतमजूर स्वतःच्या श्रमावर जगतो, ते तर खरेच आहे परंतु मालकही शेतमजूराच्या श्रमावर जगातो. समाजात विषमता पूर्वीपासूनच आहे आणि आताही स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षात आणखी वृद्धिंगतच होत आहे. शोषक आणि शोषित असे समाजाचे दोन भाग आज समाजात आहेत. एकीकडे प्रचंड संपत्तीचे ढीग आणि दुसरीकडे दारिद्र्याची खोल खाई. अशा भयाण वातावरणात कवी प्रस्थापित आणि त्यातील बदल आपल्या कवितेतून टिपत जातो.

''काळोखाच्या कविता'' या संग्रहाचे वैशिष्ट्ये हे आहे की त्यातील बहुतेक कविता म्हणजे कवीचा शेतकरी, शेतमजूर असलेल्या ''माय-बापा'' शी चाललेला संवाद होय. या संवादातूनच कवितेतील अनुभव साकार होत जातो. या कवितेच्या नजरेत भरतं ते तेथील शोषण... हाडांची काडं करून, उन्हातानात राबणाऱ्या आणि आपल्या लेकरांसाठी दिवसरात्र झटणाऱ्या माय-बापाच्या डोळ्यासमोर उभे करतो. शहरात गेल्यानंतर गावाच्या आणि माय-बापाच्या आठवणीत कवी कासावीस होतो. डोळ्यांच्या बुबुळातून त्याला आठवते मायेने मुका घेणारी माय. पडक्या घराच्या खिडकीतून कापऱ्या हातानं निरोप देणारा बाप. कवीला ''माय, माती आणि माणसं'' यांचे प्रचंड आकर्षण आहे.

परंतु आजच्या जगातील जगण्याचे माध्यम ''प्रगती, पैसा आणि प्रतिष्ठा'' हे आहे. शहराच्या चकचकणाऱ्या परंतु बकाल तामझामात अगणित प्रश्नांचे मोहळ घोंफ्लघावते कारण शहरात राहूनही आपणावर जीवापाड प्रेम करणाऱ्या वृद्ध, थकलेल्या मायबापांचे विचार असतात. शहराच्या प्रचंड चकचकाटात सुद्धा काळोखाची सोबत सुटत नाही. शहरी जीवन जगणरा कवी आपल्या कवितांतून ग्रामीण जीवनाविषयीची ओढ व्यक्त करतो. कवीचा जीव गावाच्या आठवणीनं झुरतो. परंतु तिथेही त्याचे ग्रामीण वास्तवाविषयीचे कवीचे आकलन दिसून येते. घरातल्या काळोख्या कोपऱ्यातही कवीला कवितेच्य रूपानं उजेडाची एक तिरीप दिसतच नाही तर ती त्याच्यात विलीन होते आणि कवी कवितेचंच शब्दरूपी रंगानी रंगवलेलं कोलाजरूपी चित्र काढतो.

पावसाची आतुरता सर्वांनाच व्याकुळ करते. ग्रीष्माचा प्रचंड दाह सोसताना जीव कासावीस होतो. कवी मात्र वेगवेगळ्या परिप्रेक्षातून आणि तेही मायए बाप आणि आपण या सर्वांच्या दृष्टीकोनातून पावसाची आतुरता व्यक्त करतो. ''लवकरच पाऊस येईल म्हणून कसं उधाणतं घर'' पावसाच्या येण्याची चाहूल मिळणाऱ्या खाणाखुणाचे अत्यंत सूक्ष्म चित्र कवी वाचकाच्या डोळ्यांपुढे उभे करतो. त्याची ही निरीक्षणे भन्नाट आहेत. माय दिवसरात्र घरासाठी राबराब राबते. अनेक नैसर्गिक आपत्तींपासून घराचे रक्षण करते. ती सतत घराचा विचार करीत असल्याने तिची दृष्टी घरापूरतीच अन घराच्या आतल्या वातावरणातील प्रत्येक घटकांना समजन घेणारी आहे. सच्चा ग्रामीण संवेदनशीलतेतून लिहिली गेलेली ही नामदेव कोळीची कविता आहे. ग्रामीण जीवन येथे मूळ रंगरूपासह अभिव्यक्त झालेले आहे. "भिंतीच्या पोपड्यातुन/उडणाऱ्या परांच्या मुंग्या/सडा सारवणात/वळवळणारे किडे/शेणाचे गोळे हवेत वाहून नेणारे भुंगे पाहत/सुखावते माय'' (पृ.17) ग्रामजीवन जगलेल्या, भोगलेल्या कवीच्या अनुभतींनी घेतलेले शब्दरूप मातीशी जखडलेल्या शेतकरी जीवनाचे संसुचन करते. कवीला त्याचे बालपणही आठवत असते. गावाकडच्या भेटीसाठी त्याचा जीव नेहमीच आसुसलेला.'' रोजच्या धावपळीतून/जगणं नवती व्हावं म्हणून/गावाच्या वाटेवर वळतात पाय आपोआप शहरातल्या अत्यंत भपकेबाज वातावरणातही आपल्या गावच्या मातीशी अन् तेथील जीव ओवाळून टाकणाऱ्या माणसांची आठवण व्हावी हे गावाशी कवीची नाळ किती घट्ट जुळलेली आहे याची प्रचिती देत राहते. या बदलत्या परिस्थितीत एक प्रकारचे तुटलेपण अनुभवतो. शिक्षण, नोकरी, व्यवसायानिमित्त शहरी जीवन जगताना तो शहराशी एकरूप होऊ बघतो. परंतु त्याला ते शक्य होत नाही. आपली पाळेमुळे खेड्यात रुतलेली आहेत हे त्याला स्वस्थ बसू देत नाही.

''सोरटी सोमनाथाच्या अक्षय संपत्ती इतकं बालपण'' कवीला सतत खुणावत असतं. माय आणि बाप यांच्या जीवनावर कवीने ज्या पस्तीस कविता लिहिल्यात त्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या कविता म्हणजे कवीच्या माय बापाचे जीवनचरित्रच होय. त्या दोघांच्या जीवनाचा आढावा घेत असताना ओघाओघान कवीचं जीवनचरित्र सुद्धा उलगडते. ''माय'' ही या संग्रहातील एक अत्यंत उत्कट जाणिवेची आणि अभिव्यक्तीची मार्मिक कविता. ''माय'' चं वर्ण वाचणाऱ्याच्या अंतःकरणाला व्यथित करून जातं. अनादिकाळापासून स्त्रियांच्या जीवन पुरुषप्रधान संस्कृतींनं जी एक प्रकारची कधीही भरुन न निघणारी पोकळी निर्माण केलेली आहे त्या पोकळीत ती आयुष्यभर एका विचित्र घुसमतीत जगत राहते. ही घुसमट केवळ एका स्त्रीची नसून अखिल स्त्रियांच्या वेदनेचे नेतृत्व करते.

''माय/बापाला आंधणासोबत मिळालेली/जिवंत वस्तू'' पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीचे वस्तुकरण केव्हा अन् कसे झाले हे प्रत्यक्षात स्त्रीला सुद्धा कळले नाही. अनेक समर्पक प्रतिमा घेऊन आलेली ही कविता ''माय'' चे त्यातूनच ''स्त्री'' चे वास्तवपूर्ण जीवन मांडण्याचा प्रयत्न करते. प्रत्येक घराचा कणा असते ती म्हणजे ''स्त्री''. आपल्या घराचं घरपण टिकून राहावं यासाठी प्रत्येकच स्त्री झिजत असतेए राबत असते. कवीची माय सुद्धा त्याला अपवाद नाही. एकटी माय आयुष्यभर राबली. ती कुटुंबातील एकटीच कमावणारी असल्याने असंख्य हालअपेष्टा सहन करुन तिने आपल्या परिवाराला जगवलेए तगवले. ''घरात खाणारे सात / राबायचे तिचे हात/पोटातल्या निखाऱ्यावर /ती शिजवायची भात'' स्वतः रात्रीचे उरलेले शिळे अन्न खाऊन आनंदाने विझत जाणाऱ्या गवरीच्या राखेच जीवन जगणारी ही ''माय'' मायीच्या उदारपणाचे अन् तिच्यातील ओथंबून वाहणाऱ्या मातृत्वाचे दर्शन घडविते. भारतीय कृषी संस्कृतीत विळ्याला फार महत्व आहे. विळ्याचे आणि शेतमजूराचे अतूट असं नातं आहे. कदाचित शेतमजूराचं जीवनचं विळ्याअभावी अपूर्ण आहे. कवीच्या मायच्या जीवनातही हा विळा वेगवेगळ्या अवस्थांमध्ये तिला भेटतो आहे. कवी ''माय''चं अन् विळ्याचं नातं

''विळा'' या कवितेतून अभिव्यक्त करतो. ''या विळ्याचं जन्मभराचं नातंय मायशी / इमानदारीनं दिलीय साथ त्याने ओल्या सुक्या दिवसात / पाच लेकरांच्या कापल्या नाळा'' मायला विळ्याने सुख-दुःखात साथ दिली. लेकरांची नाळ सुद्धा मायनं विळ्यानेच कापली. काबाडकष्ट आणि ढोरमेहनत करुन आता माय थकलेली. तिच्यान आता कोणत्याही प्रकारची कामे होत नाहीत. उत्पन्नाचं साधन पार थकून गेलंय. माय आता कष्ट करुन घराला तगवू शकत नाही. ज्या विळ्याच्या संगतीने मायनं घरचे दिवस काढलेत तो विळा तगवू शकत नाही. ज्या विळ्याच्या संगतीने मायनं घरचे दिवस काढलेत तो विळा आता भिंतीवर लटकून जंगटलेला. विळ्यावर धार परजवणारे बापाचे हातही आता विळ्यासारखेच बोथट झालेत. वाचणाऱ्याच्या हृदयाला सुन्न करुन टाकरणारी ही कविता वेगवेगळ्या प्रकारी आशयसुत्रे आविष्कृत करते. त्यातील एक महत्वाचे आशयसुत्र म्हणजे स्त्रियांच्या व्यथा वेदनां, दुःखाचा आविष्कार हे आहे.

मायला मरणही आलं तर दिवसभर शेतात राबून तुटक्या खाटेवर विश्रांती घेतांना. जन्मापासून मरेपर्यंत दारिद्य्रात, गरीबीत आणि अभावात जगणाऱ्या मायला आयुष्यभर गांजलेपणाला, दुःख आणि दारिद्य्राच्या कधीच विराम देता आला नाही. त्याच्या साखळदंडातून तिची सुटका कधीच होऊ शकली नाही. नितांत कष्टानं भरलेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी ही कविता आहे. आशयद्रव्य आणि अभिव्यक्ती याबाबत कोणत्याही प्रकारे त्या जीवनाशी नामदेव कोळी यांची कविता प्रतारणा करू शकत नाही. दाहक जीवन वास्तवाचे यथार्थ चित्रण करणारी ही कविता आहे. गावातल्या घरातलं अठराविश्व दारिद्य्रही ही कविता अत्यंत आत्मीयतेने मांडण्याचा प्रयत्न करते. गाव आणि शहरातलं अंतरही ग्रामीण स्त्रीच्या नजरेतून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न करते. ''माय शहरात आली तेव्हा/दिसला नाही तिला तिचा भोवताल / झाडं-झुडपं वावर शिवार/भेटली नाहीत माणसं ओळखीची/गायी गुरं कावळे - चिमण्यांही घुसमटली ती चार भिंतीत/ तिचा आर्त चिवचिवाट/ विरत गेला इथल्या गोफ्लगाटात'' मायला शहरातलं घर, जीवन बंदीवासासारखे वाटते. गावामध्ये मोकळा श्वास घेणारी माय शहरातल्या अत्यंत भेसूर वातावरणात गुदमरुन जाते. तिला मोकळा श्वास घेता येत नाही. अशाप्रकारे मायीच्या माध्यमातून आज शहरीकणाच्या प्रक्रियेत एक प्रकारचे दुभंगलेपण अनुभवणारा कवी मनात गावाकडची माती अन् जीवन जप पाहतो. बदलत्या वास्तवाला धीरगंभीरपणे सामोरे जाऊन आपल्या अनुभवांशी प्रामाणिक राहून आपल्या जाणिवा व्यक्त करतो. आपल्या भोवतालचे वास्तवत डोळसपणे बघतो अन् ''माय'' च्या अनुभूतीतून व्यक्त होते. कवीच्या अंगोपांगात कविता भिनलेली आहे. उत्स्फूर्तता, उत्कटता आणि सहजता या सर्वांतून शब्दांच्या माध्यमातून तो प्रकट होत असतो. काव्यलेखणाला आवश्यक असणारी प्रतिभा त्याच्याजवळ आहे. आपल्या प्रतिभेच्या बळावर तो आपल्या काळजात कायमस्वरूपी घर करून असलेलं दुःख कवितेतून प्रसवतो आहेच...! परंतु ''मायनं कविता लिहिली असती तर'' ती कशी अभिव्यक्त झाली असती हा प्रश्न त्याला पडतो. मायनं अत्यंत हलाखीत आपलं आयुष्य वेचलं. प्रचंड दुःख तिनं पचलेलं. लग्नापासून होत असलेला नवऱ्याचा जाच सहन करीत जगण्याच्या रोजच्या कुत्तर ओढीत तिची घुसमट होते आहे. फाटक्या जिंदगीतून रोजच अनावर होत असलेल्या आसवांना ती चुलीतल्या धुरामुळे डोळ्यात येणाऱ्या आसवांमागे लपवते आहे. जीवनाच्या प्रत्येक वळणावर तिला अमाप समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणूनच ''नसत लिहिलं नवऱ्याच्या जाचाबद्दल/जगण्याच्या रोजच्या कुत्तरओढीबद्दल/ चुलीतल्या धुरात ढाळलेल्या आसवांबद्दल/आवडत्या तरवडीच्या फुलांबद्दल/लुगड्यावरच्या धुरकट नक्षीवरही /नसतीच लिहिली तिनं कविता हे जगण्याचे प्रश्नय हे कुठे ठाऊक तिला?'' एखाद्या व्रतस्थ योगिणीसारखी कवीची माय जाणवते. स्थितपज्ञ राहून परिस्थितीशी दोन दोन हात करणारी प्रत्येक ग्रामीण ''स्त्री'' चे नेतृत्वच करते. ''माय'' च्या विभिन्न भावछटा कवीने संग्रहातील अनेक कवितांमधून रेखाटल्या आहेत. नादमयता, अर्थानुकूलता, उत्कट काव्यानुभव, नादमय आकृतिबंध या सर्वांतून ''माय'' चे एक अत्यंत मार्मिक परंतु वास्तवपूर्ण व्यक्तिचित्र कवी उभे करतो. जे वाचणऱ्याच्या काळजाला सतत धडका देत असते.

शेतकरी आणि शेतमजूर यांच्या जीवनाचा प्रतिनिधिक आत्मोद्गार 'काळोखाच्या कविता' आहे. प्राधान्याने सामान्य शेतमजुराचं जीवन या कवितेत केंद्रस्थानी आहे. एकंदरीत ही कविता ग्रामीण जीवनाच्या मुशीतून जन्माला आलेली कविता आहे. मुलानं शिकून सवरुन मोठ व्हावं म्हणून राबराब राबणारा बाप कवीनं पाहिला आहे. हा 'बाप' अत्यंत स्वाभीमानी आहे. पाटलाची खंडीभर ढोरं गव्हाऱ्यात फुकट पुस्तकांसाठी वागवणाऱ्या बापामुळे

कवीला शिक्षण घेता आलं. इतिहास, नागरिकशास्त्रा बरोबरच मूल्यशिक्षणाचे धडे तो गिरवू लागला. कवी मुद्दामच या तीन विषयांचा इथे उल्लेख करतो आहे. शेतकऱ्यांच्या, शेतमजूरांच्या पिळवणकीचा, शोषणाचा इतिहास आपल्या देशात फार जूणा आहे. कवीला या शोषणाची, कुचंबणेची अन् त्यातून निर्माण झालेल्या पिढीजात दारिद्‌य्रमयी जीवनाची कल्पना आहे. शेतकऱ्याचा, मजूराचा मुलगा म्हणून त्याने प्रत्येकक्षणी प्रतारणा सहन केली आहे. बालपणापासून आयुष्यभर मायन अन् बापानं अत्यंत हलाखीत, उपासमारीत जगल्या-भोगल्या जीवनाचा इतिहास त्याला मुखोद्गत आहे. या स्वतंत्र देशाचा एक जीवंत नागरिक म्हणून अन् त्याच्यासारख्या करोडो शेतकऱ्यांच्या जीवनात जे भोग व्यवस्थेनं निर्माण केलेले आहेत हे कवी कधीच विसरू शकत नाही. या व्यवस्थेनं शेतकऱ्यांच्या, शेतमजूरांच्या अन् सर्वसामान्य माणसांच्या जीवनात जी विचित्रसी धुसमट निर्माण केलेली आहे, आता त्याचाहिशेब मागायला कवी सबळ झालेला आहे. या देशातील प्रत्येक माणसाला मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहे. एका चांगल्या सुदृढ, शोषविरहित समाजाची निर्मिती करण्यासाठी मूल्यशिणाची किती आवश्यकता आहे हे कवी चांगलेच जाणून आहे. निरक्षर बापानं 'शिक्षणाचं' मूल्य जाणलं अन् आपला मुलगा साक्षर, सुशिक्षित बनून चांगला मोठा माणूस झाला पाहिजे या विचारानं बापानं ढोरमेहनत करून त्याला शिक्षणाचे धडे दिलेत. ''पाटलाच्या पोरीनं वापरलेली पुस्तक। मला मिळावीत म्हणून। खंडीभर ढोरंगव्हाऱ्यात फुकट वागवलीत बापानं। त्याच पुस्तकांतून शिकलो। इतिहास नागरिकशास्त्र मूल्यशिक्षण ।'' आयुष्यभर बापानं पाटलाची निष्ठेनं चाकरी केली. पाटलाकडून त्याचं अविरहितपणे टप्याटप्याने शोषण होत राहिलं. त्याच्या वावरात राबताना अन् अतीव निष्ठेने झिजताना अशा या देवरुपी कृपेने बापाच्या बोकांडी कर्जाचा भला मोठा डोफ्लगर उभा राहिला. ''पाटलाच्या टोलेगंज वाड्यातले ढोरं। कुतूहल म्हणून गेलो पहायला। आणि अडकून बसलो दावणीलाच। मग माझं फुल मार्कांनी पास होणं। स्कॉलरशिप-चित्रकला परीक्षेस बसणं। मोत्यावाणी अक्षर पहिला दुसरा नंबर। सगळं वायफळ पाटलाच्या लेखी। शिकीस्तव कुणी मास्तर हुईन। नोकरीसाठी कुठेय पोतांभर हिरव्या नोटा। हे ऐकून खचला बाप। त्याला चढवायचा नव्हता कर्जाचा आणखी डोफ्लगर। मग व्हका आणला शनिवार-रविवारचा। कधी शाळा बुडवून मी भुगल्या फेकलया तणाच्या। बापाला घरोबा सोडायचा नव्हता। आणि पाटलाला माझ्यातला मजूर। स्वतःच्या स्वार्थापोटी गरीबांच्या स्वप्नांना मातीमोल करू बघणारी पाटीलरुपी व्यवस्था किती अश्राप, अजाण लोकांचे अहित करायला क्षणाचाही विलंब लावत नाही. शेतमजुराच्या पोरानंही परंपरेनुसार आयुष्यभर आपल्या दावणीला जनावरांसारखं बांधूनच असाव. त्याच्या हुशारीचीए स्वप्नांची अन् उज्वल आयुष्याची एका क्षणात कत्तल करणारी ही व्यवस्था शोषणव्यवस्थेला किती बळकटी आणणारी आहे या प्रत्यय 'घरोबा' या कवितेतून येतो.

बाप सालोसाल मेहनत करून पाटलाचे घर भरतो अन् रिकामी ओंजळ घेऊन आपल्या घरी परततो. ग्रामीण जीवनाचे यथार्थ वास्तव प्रकट करणारी ही कविता ग्रामीण जीवनातील विकलता, दारिद्‌य्र, दुःख, वेदना, समस्या अन् शेतमजूराची दैन्यावस्था प्रकट करते. कवीने अवघे ग्रामविश्व कवितेत उभे करून खेड्यातील श्रीमंत शेतकरी आणि भूमिहीन शेतमजूर यांच्यातील संघर्ष रेखाटलेला आहे. अंगवळणी पडलेल्या नियमित, रोजच्या वाटेसारखी त्यांना दुःखही अंगवळणीच पडले आहे. 'रोज मरे त्यास कोण रडे' या म्हणीनुसार संपूर्ण आयुष्यच दुःखात बुडून गेलेलं आहे. शोक तरी कशाचा करावा हाच प्रश्न आहे.ही दुःखाची वाट पिढीजात आहे. गायीच्या मोरख्याला त्यांच्याच वासरांची दावे बांधून पुन्हा तिच परंपरा पुढे चालविण्याचा हा डाव व्यवस्थेनं कसा चालवलेला आहे याचा धगधगणारा आलेख म्हणजे नामदेव कोळी यांच्या 'काळोखाच्या कविता' हा संग्रह होय. नामदेव कोळी यांच्या 'काळोखाच्या कविता' या संग्रहातील प्रत्येक कविता म्हणजे त्यांच्या जीवनातील आठवणींचा एक 'बंधच असून तो केवळ एका व्यक्तीपुरता सिमीत राहत नाही तर तो समग्र शोषीत, पिडीत, वंचित समूहाचा अन् संस्कृतीचा म्हणून समोर येतो. आपल्या जीवनातील

वेगवेगळे अनुभव आणि दाहक आठवणींच्या माध्यमातून कोळींची कविता शब्दरूप घेते. समाजाचे अन् तेही ग्रामसंस्कृतीचे बकालपण वास्तवपूर्ण पद्धतीने व्यक्त करते. नामदेव कोळींच्या कवितेच्या रूपानं अखिल शेतमजुरांच्या व्यथा वेदनांना तोफ्लड फोडण्याचं अत्यंत महत्वाचं कार्य झालेलं आहे. व्यक्तिचित्रांच्या स्वरूपातील अनेक कविता असून 'माय'चे व्यक्तिचित्र, बापाचे व्यक्तिचित्र, बहिणीचे व्यक्तिचित्र, पाटलाचे व्यक्तिचित्र अत्यंत जीवंत आणि परिणामकारक उतरलेले आहेत. नामदेव कोळींची कविता ग्रामीण जीवनानुभवाची रोखठोक मांडणी करून कृषीसंस्कृतीच्या पडझडीचे, शेतकऱ्यांच्या पिचलेपणाचे आणि उपेक्षितपणाचे चित्र अधोरेखित करते. एकुणच ग्रामजीवनातील व्यामिश्र जीवनानुभव अत्यंत उत्कटतेने प्रकट करणारी आणि ग्रामीण जीवनाचे अंर्तबाह्य विविध पदर उलगडून दाखवणारी ही कविता समकालीन मराठी कवितेला समृद्ध करणारी कविता आहे.